# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 30/11/2019 (शनिवार)
# (दुपार)

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

1) पो.स्टे. नरखेड – दिनांक 29/11/19 चे 11.00 वा. ते 17:00 वा. चे सुमारास पो.स्टे. नरखेड हद्दीत फिर्यादी यांच्या 16 वर्षीय मुलाला अज्ञात आरोपी फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री अरून खोटेमाटे हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा – दिनांक 28/11/19 चे 12.30 वा. चे सुमारास पो.स्टे. खापरखेडा हद्दीत फिर्यादी यांच्या 14 वर्षीय मुलगी हिला आरोपी नामे– पंकज गणेश शिवरकर, वय 21 वर्ष, रा. आपटी, ता. देवळी जि. वर्धा याने लग्नाचे आमीष दाखवुन व फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 363, 366(अ) भादंवि. प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक मलकुवार या करीत आहे.

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावर बसस्टॉप कोंढाळी येथे दिनांक 29/11/2019 चे 12.33 वा. दरम्यान आरोपी नामे – राहुल उर्फ लाला संजय जैस्वाल, वय 24 वर्ष, रा. धुरखेडा, हमु टिचर कॉलनी, कोंढाळी ता. काटोल हा स्वतः जवळ कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या हातात तलवार घेवुन मिळुन आला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोशि श्री. गौरव मोकडे, पोस्टे. कोंढाळी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपिविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक राठोड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर